ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 58.

वर्ष २७ | पुणें, बुधवार तारीख १७ मे, १९६१ | अंक १०

पाळण्याला बाशिंग ...

अेक काळ असा होता की, मुलगी पाळण्यांत असतांनाच लग्न ठरत असे, पण जमाना आतां पार बदलला आहे. लग्नापूर्वी मुलीला शिकवावें लागते नी त्यानंतर लग्नाचा खर्च करावा लागतो, त्याची तरतूद मुलगी पाळण्यांत असतांनाच विमा उतरवून करतां येते. तुम्ही हयात असा अगर नसा ठरलेल्या वेळी विम्याची रक्कम मिळणारच. उदा:- तुमचे वय २५ व तुमच्या मुलीचे १ वर्ष. दरमहा सुमारें रु. १० विम्यांत गुंतविले तर तिच्या वयाच्या २० व्या वर्षी लग्नासाठीं रु. ३,००० मिळतील. दुर्दैवानें तत्पूर्वी मृत्यू ओढवल्यास (हप्ते मात्र ताबडतोब थांबतात आणि पूर्ण पैसे त्या ठरलेल्या वेळीं मिळतातच.

विमा एजंटाला तुम्हांला किती हप्ता पडेल ते विचारा.

आयुर्विम्याला पर्याय नाहीं



## भारतांतील पांच बड्या बँका

### १९६० मधील प्रगति

स्टेट बँक ऑफ इंडियाचें वैशिष्टयपूर्ण महत्त्वाचें स्थान लक्षांत घेऊन, ती बँक वगळून पांच बड्या बँकांची तुलना येथें केली आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, युनायटेड कमर्शिअल बँक आणि बँक ऑफ बरोडा ह्या त्या पांच बड्या बँका होत. स्टेट बँक ऑफ इंडिया वगळून, शेड्यूल्ड बँकांकडील ठेवी १९६० अखेर १,३१९ कोटी रु. च्या झाल्या; १९५९ अखेर त्या १,२६६ कोटी रु. च्या होत्या. त्या ठेवीं-पैकी ४७% ठेवी ह्या पांच बड्या बँकांकडे होत्या. इन्व्हेस्टमेंट्स-मधील त्यांचा हिस्सा ४७% होता, तर दिलेल्या कर्जांत त्यांचा हिस्सा ५७% होता.

१९६० सालीं बड्या पांच बँकांकडील ठेवींत २२ कोटी रु. ची भर पडली; म्हणजे त्यांत ३·७% वाढ झाली. पांच बड्या बँकांपैकी दोन बँकांकडील ठेवींत घट झाली; पंजाब नॅशनलच्या ठेवी १४१ कोटी रु. वरून १३९ कोटी रु. वर आल्या, तर युनायटेड कमर्शिअलच्या ठेवी ८ कोटी रु. नीं घटून ८९ कोटी रु. वर आल्या. बाकीच्या तीन बँकांकडील ठेवींच्या वाढीची गति कमी झाली, तर ह्या दोन बँकांकडील ठेवींत प्रत्यक्ष घट आढळून आली.

१९६० सालीं, पांच बड्या बँकांची सरकारी रोख्यांतील गुंतवणूक २१% नें उतरली आणि कर्जें २२% नें वाढलीं. सेंट्रल बँक आणि बँक ऑफ इंडिया ह्यांच्या बाबतींत कर्जांचें प्रमाण ७५% पेक्षाहि जास्त होतें.

१९६० सालीं बँक ऑफ बरोडामध्यें हिंद बँक समाविष्ट झाल्यामुळें त्या बँकेचें भांडवल २५ लक्ष रुपयांनीं वाढलें, ह्याखेरीज पांच बड्या बँकांच्या भागभांडवलांत फरक पडला नाहीं. पांच बड्या बँकांनीं रिझर्व्हज ५० लक्ष रुपयांनीं वाढविलें, त्यापैकी एकट्या युनायटेड कमर्शिअलनेंच ३० लक्ष रु. रिझर्व्हमध्यें वाढ दाखविली; त्याचें कारण फक्त त्याच बँकेचे रिझर्व्ह भाग भांडवलापेक्षा कमी होतें. १९६० अखेर, पांचहि बँकांचे रिझर्व्ह भाग भांडवलापेक्षा जास्त झाले आहेत. त्यामुळें आतां कोणत्याच बँकेला रिझर्व्हमध्यें प्रकट रीतीनें भर घालण्याची आवश्यकता उरलेली नाहीं. बँक ऑफ इंडियानें गेलीं कित्येक वर्षें रिझर्व्ह फंडांत वाढ दाखविलेली नाहीं; गुप्त रीतीनें त्याची तरतूद केली असली पाहिजे, हें उघड आहे. भागभांडवलाइतके रिझर्व्ह झाल्यावर, नफ्यांतून रिझर्व्ह फंडाकडे रक्कम वर्ग करण्याचें बंधन बँकांवर नाहीं.

---

### पोस्टाचीं नवीं तिकिटें

दि. ६ मे, १९६१ रोजीं कै. मोतिलाल नेहरू यांची जन्म-शताब्दि व ७ मे, १९६१ रोजीं रवींद्रनाथ टागोर जन्मशताब्दि-निमित्त पोस्टाचीं नवीं तिकिटें काढण्यांत आलीं. त्याचप्रमाणें ८, जून १९६१ रोजीं आकाशवाणी रौप्य-महोत्सव, या निमित्तानें पोस्टाचीं नवीन तीन तिकिटें निघणार आहेत.

---

### अमेरिकेचीं परदेशांतील विमानकेंद्रें

अमेरिकेनें आठ परदेशांतील आपलीं २१ विमानकेंद्रें बंद करण्याचें किंवा त्यांचें काम कमी करण्याचें ठरविलें आहे. त्यामुळें अमेरिकन एअर फोर्समधील सुमारें १९,००० लोकांना अमेरिकेला परतावें लागेल आणि त्या सरकारची दरसाल ५० कोटी रुपयांची परदेशी हुंडणावळ वांचेल.

### सहकारी बँकांचें एकत्रीकरण

महाराष्ट्र स्टेट को. बँक आणि विदर्भ को. बँक ह्यांचें एकत्री-करण झालें असून नव्या डायरेक्टर बोर्डाची सरकारनें नियुक्ति केली आहे. प्रो. गाडगीळ हे चेअरमन असून श्री. भाऊसाहेब हिरे हे व्हाइस चेअरमन आहेत. ही बँक भारतांतील सर्वांत मोठी केंद्रीय सहकारी बँक बनली आहे. अधिकृत भांडवल ५ कोटी रु., वसूल भांडवल ३·४२ कोटी रु., रिझर्व्ह फंड ५३ लक्ष रु. इतर रिझर्व्ह ४५ लक्ष रु., ठेवी २२ कोटी रु., खेळतें भांडवल ४१ कोटी रु., असे तिच्या व्यवहाराचे आंकडे आहेत.

---

### दि बँक ऑफ सिटिझन्स लि

दि बँक ऑफ सिटिझन्स लि., बेळगांव, ह्या बँकेला ७ मे, १९६१ अखेर मोरेटोरियम देण्यांत आला आहे. ह्या बँकेची मुख्य कचेरी बेळगांव येथें असून तिच्या १५ ठिकाणीं शाखा आहेत. १९५९ अखेरच्या आंकड्यांप्रमाणें तिचेकडे २० लक्ष रु. च्या ठेवी होत्या, आणि ताळेबंदांत २ लक्ष, १५ हजार रु. तोटा दाखविलेला होता.

---

### नटाचा राज्यप्रमुख झाला

दक्षिण आफ्रिकेचे पहिले अध्यक्ष, मि. चार्लस रॉबर्टस स्वार्ट, हे एकेकाळीं सिनेमांत नट होते. त्यांच्याखेरीज कोणत्याहि नटाला राज्यप्रमुख होण्याचा अद्याप मान मिळालेला नाहीं.

---

**The Travancore Ogale Glass Mfg. Co., Ltd.**

## NOTICE

The Eighteenth Annual General Meeting of the shareholders of the company will be held at the Glass Factory premises, Registered Office, Manjummel, Alwaye, on Friday, the 9th June, at 4 p. m. to receive and adopt the Directors' Report and audited Balance Sheet and Profit and Loss Account for the year ended 31st December 1960, to sanction declaration of a Dividend, to elect Directors in place of those retiring and to appoint Auditors for the current year and fix their remuneration.

The Share Transfer Books of the Company will be closed from Monday, the 29th May to Friday, the 9th June, 1961 both days inclusive.

A member entitled to attend and vote at the meeting is entitled to appoint a proxy who will attend and vote instead of himself when poll is demanded and the proxy need not be a member.

By Order of the Board,
For OGALE BROS. (PRIVATE) Ltd.,
Managing Agents,
**N. P. OGALE,**
Director.

Manjummel, Alwaye,
March 29, 1961.

**The Dividend, when sanctioned, will be made payable on and after July 11, 1961, to those shareholders whose names stand on the Register on Friday, the 9th June, 1961.**

## सध्यांचें राहाणीचें मान टिकूं शकलें, तरी मिळविली !

[ मि. यूजेन ब्लॅक, जागतिक बँकेचे अध्यक्ष, ह्यांचे यु. ने. च्या युनेस्कोमधील भाषण ]

"१९५० मध्यें जगांत पूर्वी ४ लोक होते त्या जागीं आतां ५ आहेत. आज ज्या जागीं ५ आहेत, त्या जागीं ४० वर्षांत १० होतील. गेल्या फक्त अर्ध्या मिनिटांत ९० अर्भकें जन्माला आलीं असतील आणि फक्त ६० लोक मृत्यु पावले असतील. म्हणजे, मिनिटाला ६० ह्या गतीनें लोकसंख्या वाढत आहे.

"३०० वर्षांपूर्वी जगांत फक्त ५० कोटी लोक होते; त्यांत मंद गतीनें वाढ होत होती; जननसंख्या मोठी असली तरी मृत्युसंख्याहि जबर होती, त्यामुळें प्रत्यक्ष वाढ बेताचीच होई. मृत्यूचें प्रमाण कमी होणें स्वागतार्हच आहे; हें प्रमाण आणखी घटतच जाणार. पण ह्यापुढें दरवर्षी हजारांतले २० च लोक मरणार असले, तर दर हजारी ४० जननसंख्येमुळें लोकसंख्या भयंकर वाढणें अपरिहार्य आहे. मृत्युसंख्या घटली, म्हणून जननसंख्या कमी होण्याचीं लक्षणें दिसत नाहींत. रोग हटविण्याचा प्रयत्न संतति हटविण्याच्या प्रयत्नांपेक्षा सोपा असतो. संततिनियोजनासाठी सोपी व स्वस्त युक्ति अजून निघालेली नाहीं.

"गरीब देशांतील राहाणीचें मान वाढविण्याचे आपले प्रयत्न लोकसंख्यावाढीमुळें निरुपयोगी ठरणार आहेत. सध्यांच्या राहाणीचें मान टिकून राहील, असें म्हणणाऱ्याला सुद्धां आशावादी म्हणावें लागेल ! निराशावाद्याला हा आशावाद मुळींच पटणार नाहीं. लोकसंख्येच्या वाढीस आळा घालतां आला नाहीं, तर आशिया व मध्यपूर्व येथील दाटीच्या वस्तीच्या देशांच्या आर्थिक उद्धाराची आशा आपणांस सोडून द्यावी लागेल. आंतरराष्ट्रीय संस्थांना ह्या बाबतींत फारसें करतां येणार नाहीं; ज्या त्या देशाच्या सरकारनेंच आपआपल्या आकांक्षांना धक्का देणाऱ्या गोष्टींवर उपाय योजायला हवेत."

## मद्रास राज्यांत वृद्धापकाळचें पेन्शन

मद्रास सरकार चवथ्या पंचवार्षिक कार्यक्रमापासून वृद्धापकाळचें पेन्शन द्यावयास सुरवात करणार आहे, असें राज्याचे मुख्यमंत्री श्री. कामराज ह्यांनीं जाहीर केलें आहे. जे लोक ५५ वर्षांपेक्षा अधिक वयाचे आहेत ते पेन्शनला योग्य ठरविले जातील. त्यांना दरमहा रु. २० ते २५ पर्यंत पेन्शन दिलें जाण्याचा संभव आहे. भारतामधील इतर राज्यांपैकीं केरळ व उत्तरप्रदेश ह्या राज्यांतून वृद्धापकाळच्या पेन्शनची व्यवस्था करण्यांत आली आहे.

## ग्रामीण भागांतील बेकारीचा प्रश्न

नुकत्याच झालेल्या शिरगणतीवरून असें दिसून आलें आहे कीं ग्रामीण भागांतील बेकारी अंदाजापेक्षा अधिक आहे. ग्रामीण भागांत स्थानिक कामें काढून बेकारी दूर करण्यासाठी तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ५० कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. परंतु ह्या रकमेंत बरीच वाढ करण्यांत येण्याचा संभव आहे. काम करण्यास लायक अशा २० ते ३० लाख लोकांची भर रोजगार मिळवूं इच्छिणाऱ्या लोकांत पडेल असा अंदाज आहे. आधींच बिकट असलेला हा प्रश्न त्यामुळें विशेष गंभीर स्वरूप धारण करूं लागला आहे.

## मि. ए. सी. क्लार्क

दि बँक ऑफ इंडियाचे एक माजी जनरल मॅनेजर मि. ए. सी. क्लार्क हे इंग्लंडमध्यें नुकतेच वयाच्या ६७ व्या वर्षीं मृत्यु पावले.

## अंतराळ प्रवासाच्या प्रयोगांतील अमेरिकेचें यश

अमेरिकेनें कमांडर शेपर्ड ह्यांना एका अग्निबाणांतून पृथ्वीपासून ११५ मैल उंचीवर पाठविलें व १५ मिनिटांनीं त्यांना परत आणलें. अमेरिकेच्या ह्या यशामुळें अमेरिकेंतील लोकांना आनंद होणें स्वाभाविक आहे. पण शास्त्रीय जगतामधील तज्ज्ञांनीं रशिआच्या ह्या बाबतींतील यशाचें योग्य मूल्यमापन केलें आहे. रशिआचा युरी गागारिन हा सुमारें १॥ तास पृथ्वीभोंवतीं फिरत होता. त्याच्याजवळ १० दिवस पुरेल इतकी अन्नसामग्री होती. पृथ्वीभोंवतीं भ्रमण करीत असतांनाच ह्या गर्तापासून वेगळे होऊन पुन्हां पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या कक्षेंत येऊन व्यवस्थित उतरण्याचें बिकट कार्य रशियाच्या अंतराळयानानें पार पाडलें. त्या मानानें अमेरिकेच्या प्रयोगाचें यश कमी ठरतें असें तज्ज्ञांचें मत आहे. तथापि, रशिआ व अमेरिका ह्यांच्यांतील तांत्रिक प्रगतीचें अंतर कमी झालें आहे ह्यांत मात्र शंका नाहीं. अमेरिकेच्या प्रगतीसंबंधीं लिहितांना लंडन टाइम्सनें असें म्हटलें आहे कीं, १९५७ पासून अंतराळ प्रवासाच्या शास्त्रांत अमेरिकेला रशिआपुढें हार खावी लागली. त्यामुळें अमेरिकेंत एकप्रकारची न्यूनगंडाची भावना निर्माण झाली होती. ही भावना कमी होणें आतां शक्य होईल. डेली टेलिग्राफ हें पत्र असें म्हणतें कीं, अंतराळ प्रवासाच्या शास्त्रांत स्पर्धा करून यश मिळविण्यापेक्षा जगांत वजन वाढविण्याचे इतर मार्ग आहेत. जगांत आज असे पुष्कळ लोक आहेत कीं त्यांच्याजवळ एका वेळच्या जेवणापुरताहि शिधा नाहीं. त्यांना पृथ्वीभोंवतीं प्रदक्षिणा घालूं शकणाऱ्या उपग्रहस्थित माणसांविषयीं फारसें कांहीं वाटण्याची शक्यता नाहीं. अशा लोकांना जगण्यासाठी मदत देणाऱ्या देशाची इभ्रत सहजच वाढीला लागेल.

## सिमेंटची टंचाई दूर करण्याचे प्रयत्न

गेले कांहीं महिने भारतामधील सर्वच राज्यांत सिमेंटची टंचाई भासत आहे. महाराष्ट्र सरकारनें मध्यवर्ती सरकारकडे अशी मागणी केली आहे कीं पावसाळा सुरू होण्यापूर्वी राज्याला पुरेसा सिमेंटचा पुरवठा करण्यांत यावा. सिमेंटच्या टंचाईचीं कारणें पुढील-प्रमाणें सांगण्यांत येत आहेत. सर्वच राज्यांत सिमेंटची मागणी कांहीं प्रमाणांत एकदम वाढलेली आहे. पण त्याचबरोबर सिमेंटच्या कारखान्यांतील उत्पादन मात्र बरेंच कमी झालेलें आहे. मागणी जास्त व पुरवठा अपुरा त्यामुळें नेहमींच उद्भवणारी परिस्थिति आजहि निर्माण झाली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीच्या सुमाराला बांधकामाचा वेग वाढला. सार्वजनिक मालकीच्या विभागांत जीं कामें सुरू होतीं तीं पंचवार्षिक कार्यक्रम संपण्याच्या आंत पुरी करण्याची घाई उडाली. कार्यक्रमांतील उद्दिष्टें गांठण्याचा प्रयत्न करण्याच्या धडपडींत अशी घाई होणें अपरिहार्यच होतें. ह्याच सुमारास सिमेंटच्या कारखान्यांना लागणाऱ्या कोळशाच्या पुरवठ्यांत व्यत्यय आला. म्हणजे मागणी पूर्ण करण्यासाठी ज्यावेळीं कारखान्यांना अधिक उत्पादन करणें आवश्यक होतें, त्याचवेळीं त्यांचें उत्पादन कोळशाच्या टंचाईमुळें घटलें. त्यांतच वाहातुकीसाठी लागणाऱ्या रेल्वे वाघिणीहि भरपूर मिळेनाशा झाल्या. सिमेंट कारखान्यासाठी लागणारा कोळसा वाहून नेण्यासाठी पुरेशा वाघिणी मिळाल्या नाहींत. त्याचप्रमाणें कारखान्यांपासून सिमेंटच्या खपाच्या केंद्रापर्यंत सिमेंट वाहून नेण्यासहि त्या मिळाल्या नाहींत. तथापि आतां वहातुकींतील अडचणी हळूहळू कमी होऊं लागल्या आहेत. त्यामुळें कारखान्यांमधील उत्पादन वाढेल आणि सिमेंटचा वाटवहाहि नीट होऊं लागेल असा भरंवसा वाटूं लागला आहे.

## प्रवरा सहकारी साखर कारखान्यानें केलेला ग्रामीण जीवनाचा कायापालट

पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांनीं सोमवार ता. १५-५-६१ रोजीं भारतांतील पहिल्या यशस्वी सहकारी साखर कारखान्यास भेट दिली.

प्रवरा कारखान्याची स्थापना सन १९४९ सालीं झाली. शेतीच्या कच्च्या मालावर प्रक्रिया करून त्याचें पक्क्या मालांत रूपांतर करण्यासाठी मोठ्या प्रमाणांत कारखाना उभारून तो शेतकऱ्यांनींच चालवावयाचा हा यशस्वी प्रयोग सबंध भारतांत पहिलाच होय. पद्मश्री विखे पाटील, कै. यशवंतराव टेकावडे, श्री. शंकरराव धुमाळ व त्यांचे सहकारी ही शेतकरी मंडळी पुढें आली आणि त्यांनीं हा कारखाना स्थापन करण्यास पुढाकार घेतला. प्रा. धनंजयराव गाडगीळ व श्री. वैकुंठभाई मेहता यांचें ह्या कामीं बहुमोल मार्गदर्शन झालें.

प्रवरा सहकारी कारखाना हा सन १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेला आहे. फक्त शेती धारण करणारा शेतकरीच या कारखान्याचा भागीदार होऊं शकतो व त्यास उत्पादक सभासद असें संबोधिलें जातें.

कारखान्याचे पोटनियमाप्रमाणें कुणाहि एका भागीदारास २५ एकरचे शेअर भागापेक्षा जास्त भाग धारण करतां येत नाहींत. २५ एकरचे भागापर्यंत कितीहि भाग धारण केले तरी एका सभासदास एकच मत देण्याचा अधिकार आहे. शेतकऱ्यांचे प्रतिनिधीच कारखान्याचा कारभार चालवितात. कारखान्याचे ८० टक्के सभासद एक किंवा दोन-तीन एकर उंसाची शेती असलेले लहान लहान शेतकरी आहेत. कारखान्याचे सुमारें १,५०० सभासद आहेत आणि राहुरी, संगमनेर व श्रीरामपूर या तालुक्यांतील ४१ गांवांचा समावेश या कारखान्याचे कार्यक्षेत्रांत केलेला आहे.

पद्मश्री विखेपाटील हे हल्लीं प्रा. ध. रा. गाडगीळ यांचे ऐवजीं चेअरमन म्हणून काम पाहात आहेत. पद्मश्री विखे पाटील हे या भागांतील अतिशय जुने सहकारी कार्यकर्ते आहेत. १९२० सालापासून ते सहकारी चळवळींत काम करीत आहेत.

सुरुवातीच्या काळांत या संस्थेस सहकारी खात्याकडून मान्यता मिळविण्यास अतिशय त्रास झाला. अशा प्रकारें शेतकरी मंडळींना इतकी मोठी कारखानदारी चालवितां येणार नाहीं असा बऱ्याच सरकारी वरिष्ठ अधिकारी मंडळींचा समज होता. औद्योगिक कायद्यान्वयें भारत सरकारकडून परवाना मिळविण्यासाठी (इंडस्ट्रिअल लायसेन्स) ३-४ वर्षे प्रयत्न करावे लागले. तथापि कारखान्यास मान्यता मिळाल्यानंतर मात्र राज्य सरकार आणि भारत सरकार यांनीं या कारखान्यास आर्थिक बहुमोल मदत केली व सतत करीत आलेले आहेत. मुंबई राज्य सरकारच्या मदतीशिवाय कारखाना उभारणें व यशस्वी करणें तर अशक्यप्राय होतें.

मुंबई राज्य सहकारी बँकेच्या चालकांनीं प्रथमपासून या कार्यास चालना देण्यास फार मदत केली.

राज्य सरकारनें प्रयोग म्हणून या कारखान्यास प्रथम सहा लक्ष व नंतर १० लक्ष रुपये देऊन भागीदारी करण्याचें मान्य केलें.

इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनकडून कारखान्यास प्रथम २० लक्ष रु. व तदनंतर १५ लक्ष रुपये कर्ज मिळालें.

प्रवरा कारखाना लोकप्रतिनिधींनीं चालवून कल्पनातीत यशस्वी केल्यामुळें सरकारचाहि सहकारी चळवळीकडे पाहण्याचा दृष्टिकोन आमूलाग्र बदलला. नवीन साखर कारखान्यास परवाना देतांना प्रथम सहकारी कारखान्यास परवाना द्यावयाचा, असें धोरण भारत सरकारनें मान्य केलें आहे.

प्रवरा कारखाना यशस्वी झाल्यामुळें महाराष्ट्रांत गेल्या १० वर्षांत १४ सहकारी कारखाने प्रत्यक्ष चालू असून साखर उत्पादनाचें काम करीत आहेत. नवीन ६ कारखान्यांना परवाने मिळाले असून ते उभारणीचें काम हल्लीं चालू आहे. येत्या ३-४ वर्षांत महाराष्ट्रांत सुमारें २० सहकारी साखर कारखाने चालू असलेले दिसतील.

महाराष्ट्रांत उत्पादन होणाऱ्या साखरेपैकीं ५० टक्के साखर सहकारी कारखाने उत्पादन करीत आहेत आणि येत्या २-३ वर्षांत हें प्रमाण ७० टक्क्यांपर्यंत जाईल. सहकारी कारखानदारीमुळें हजारों तंत्रज्ञांना व कुशल व निमकुशल कामगारांना काम मिळण्याची सोय झाली आहे. सहकारी कारखान्यावर सुमारें २ लक्ष कामगार-कुटुंबियांचा आणि ३ लक्ष शेतकऱ्यांचा प्रपंच हल्लीं अवलंबून आहे. महाराष्ट्राची भूमि ही ऊंसउत्पादनाला अतिशय अनुकूल अशी आहे.

प्रवरा कारखान्याचें यश पुढील १-२ उदाहरणांवरून अजमावितां येईल.

प्रवरा कारखान्यानें इंडस्ट्रियल फायनान्स कार्पोरेशन ऑफ इंडिया कडून एकूण रक्कम रु. ३५ लक्ष रुपयांचें कर्ज घेतलें होतें तें कर्ज फेडण्याची मुदत १९६३ पर्यंत होती. परंतु या मुदतीपूर्वीच कारखान्यानें सन १९६० सालांत सर्व कर्जाची फेड केली आहे.

महाराष्ट्र राज्य सरकारकडून १० लक्ष रु. भाग भांडवल म्हणून कारखान्यानें घेतले होते तेहि भांडवल कारखान्यानें सरकारला परत केलें आहे.

कारखान्यानें आतांपर्यंत भारत सरकारला कराच्या रूपानें (एक्साईज ड्यूटी) एकूण तीन कोटी, नऊ लक्ष, सत्तर हजार आणि राज्य सरकारला 'केन सेस' या रूपानें अडुसष्ट लक्ष, सडुसष्ट हजार, दोनशें रुपये दिलेले आहेत.

गेल्या वर्षापासून प्राप्तीकराहि कारखान्यास लागू झाल्यामुळें कारखान्यानें गेल्या वर्षी चार लक्ष, अडुसष्ट हजार सहाशें सरकारला प्राप्तिकराचे दिलेले आहेत. कारखान्यामुळें केवळ शेतकऱ्यांना आपल्या कच्च्या मालाची योग्य किंमत मिळूं लागली. कामगारांना शाश्वत रोजगार मिळूं लागला. एवढेंच नव्हे तर सरकारचे उत्पन्नांतहि फार मोठी भर पडली आहे.

कारखान्यानें कारखान्याच्या हद्दींत ५ हायस्कुलें चालविलीं असून त्यामुळें ग्रामीण भागांत खेड्यांतील मुलांमुलींना दुय्यम शिक्षण घेण्याची संधि उपलब्ध झालेली आहे. हीं हायस्कुलें चालविण्याकरितां कारखाना ज्या तऱ्हेनें रक्कम उभी करतो तीहि वैशिष्ट्यपूर्ण आहे. दर टनामागें चार आणे या प्रमाणें शेतकऱ्याकडून शिक्षणकार्यासाठी वर्गणी म्हणून घेतली जाते व अशा तऱ्हेनें दरवर्षी ५०,०००-०० रु. शिक्षण कार्याप्रीत्यर्थ जमा होतात.

प्रवरा कारखान्याच्या पुढाकारानें आणि नगर जिल्ह्यांतील इतर सहकारी कारखान्यांच्या मदतीनें श्रीरामपूर येथें आर्टस, सायन्स व कॉमर्स कॉलेज गेल्या वर्षापासून स्थापन केलें आहे.

कारखाना सुरू होण्यापूर्वी कारखान्याचे हद्दींत विहिरींची संख्या २८८ होती ती आतां १,५३१ झाली आहे.

कारखाना सुरू होण्यापूर्वी ३२ इंजिनें व आतां कारखान्याच्या हद्दींत १,००५ इंजिनें आहेत.

# अर्थ

बुधवार, ता. १७ मे, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## इंडस्ट्रिअल फायनॅन्स कॉर्पोरेशनचें कार्य

मध्यवर्ती सरकारच्या इंडस्ट्रिअल फायनॅन्स कॉर्पोरेशननें खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना आतांपर्यंत १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक कर्जे मंजूर केलेलीं आहेत. भारताचे औद्योगीकरण झपाट्यानें व्हावें म्हणून ह्या कॉर्पोरेशनची स्थापना १३ वर्षांपूर्वी करण्यांत आली. कॉर्पोरेशननें मदत केलेल्या उद्योगधंद्यांत साखरेच्या कारखान्यांचा क्रम पहिला लागतो. त्यांतहि सहकारी साखर कारखान्यांना अधिक मदत देण्यांत आलेली आहे. साखरेच्या धंद्याला आतांपर्यंत २९.३७ कोटी रुपयांचीं कर्जे देण्यांत आलेलीं आहेत. त्यानंतर पुढील धंद्यांचे अनुक्रम लागतात. कापड गिरण्या १५.७ कोटी; कागद ११.८८ कोटी; रासायनिक कारखाने १०.७८ कोटी; एंजिनिअरिंग १०.६२ कोटी; सिमेंट ६.६७ कोटी; काच ४.९६ कोटी; लोखंडाव्यतिरिक्त धातू ३.३३ कोटी व इतर ७.७७ कोटी. १९५५ सालीं इंडस्ट्रिअल फायनॅन्स कॉर्पोरेशनच्या कायद्यांत दुरुस्ती करण्यांत आली. कॉर्पोरेशनच्या कार्याचा विस्तार व्हावा असा हेतु त्यामागें होता. त्यानंतर कॉर्पोरेशनचा कारभार पाहण्यासाठी पूर्ण वेळ काम करणारा एक अध्यक्ष नेमण्यांत आला. त्याचा अपेक्षित परिणाम होऊन कॉर्पोरेशनचें कार्य चांगलें वाढीस लागलें. १९४८ ते १९५५ ह्या कालखंडांत कॉर्पोरेशननें २८.७ कोटी रुपयांचीं कर्जे मंजूर केलीं होतीं व त्यांपैकी १४.५ कोटींची वांटणी करण्यांत आली होती. १९५५ पासून आतांपर्यंत ७३.१० कोटी रुपयांचीं कर्जे मंजूर करण्यांत आलीं व त्यांतील ४१.६२ कोटी रुपयांचीं कर्जे प्रत्यक्ष वांटण्यांत आलीं. ह्यावरून कॉर्पोरेशनच्या कार्याच्या वाढत चाललेल्या पसाऱ्याची कल्पना करतां येईल. भारताच्या औद्योगीकरणाला कॉर्पोरेशनकडून चांगला हातभार लागत आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---

## अमेरिकेच्या मदतीची बदलती पार्श्वभूमि

भारतामधील अमेरिकेचे माजी वकील आणि सध्यांचे हंगामी सेक्रेटरी ऑफ स्टेट मि. चेस्टर बौल्स ह्यांनीं अमेरिका परदेशांना देत असलेल्या मदतीबद्दलचे आपले विचार व्यक्त केले आहेत. ह्या विषयावर अमेरिकेमधील टेलिव्हिजनवर एक परिसंवाद योजण्यांत आला होता व त्या परिसंवादांत मि. पॉल हॉफमन, कु. बारबरा वार्ड, श्री. बी. के. नेहरू, इत्यादींनीं भाग घेतला होता. मि. हॉफमन संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या खास मदतनिधीचे माजी डायरेक्टर आहेत. कु. वार्ड ह्या ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ आहेत आणि श्री. बी. के. नेहरू हे भारताचे कमिशनर जनरल फॉर इकॉनॉमिक अफेअर्स आहेत. मि. बौल्स आपल्या भाषणांत म्हणाले कीं, परदेशांना मदत देण्यासंबंधींच्या अमेरिकेच्या पूर्वीच्या धोरणांत काहीं फार मोठे दोष होते. परदेशांना मदत देतांना अमेरिका फक्त एकाच मुद्याचा विचार करीत असे. मदत घेणाऱ्या देशाला कम्युनिझमपासून धोका असेल तर त्या देशाला ताबडतोब मदत करण्यांत येई. तसा धोका नसेल तर मदत मिळत नसे. पण अशा तऱ्हेनें देशांना 'विकत घेणें' शक्य होणार नाहीं, असें केनेडी राजवटीचें मत आहे. निदान कोणताहि देश स्वतःला कायम विकून घेणार नाहीं अशी आतां अमेरिकेची खात्री झाली आहे. केनेडींच्या सरकारचें धोरण तीन मुद्यांच्या बाबतींत भिन्न असेल. (१) मदतीनें काय साधावयाचें ह्याची स्पष्ट कल्पना ठरविण्यांत येईल. (२) मदतीचा कार्यक्रम दीर्घ कालावधीचा असेल; एक एक वर्षापुरता तो ठरविण्यांत येणार नाहीं. आणि (३) जे देश आपल्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करीत असतील त्यांना मदत देण्यावर अधिक भर देण्यांत येईल. त्यामुळें मदत घेणाऱ्या देशाची प्रतिष्ठा वाढीला लागेल.

---

## मध्यप्रदेशाच्या राजधानीसाठी मदतीची मागणी

हिंदमधील राज्यांची पुनर्घटना करण्यांत आल्यावर मध्यप्रदेश राज्याला आपली राजधानी भोपाळ येथें नव्यानें स्थापन करण्याची पाळी आली. परंतु भोपाळ येथें राजधानीला जरूर त्या प्रकारच्या सोयी नव्हत्या. त्यामुळें १३ कोट रुपये खर्चून जरूर त्या सोयी व सुधारणा करण्यासाठी एक योजना आंखण्यांत आली. आतांपर्यंत ६ कोटी रुपये खर्च करण्यांत आले असून राज्य सरकारनें भारत सरकारकडे मदतीची मागणी केली आहे. राजधानींत सचिवालय, राजभवनाची सुधारणा, विधानसभेची इमारत, आमदारांना निवासस्थानें, इत्यादींसाठी इमारतींची आवश्यकता आहे. ह्या इमारतीवर होणारा खर्च अर्थातच अनुत्पादक आहे. इमारतीसाठी होणारा खर्च मध्यवर्ती सरकारनें द्यावा अशी मागणी राज्य सरकारतर्फे करण्यांत आली आहे. त्याशिवाय राहण्यासाठी बांधण्यांत येत असलेल्या इमारतींच्या खर्चापैकी ५० टक्के खर्चाचीहि मागणी करण्यांत आली आहे. तिसऱ्या व चवथ्या श्रेणीच्या नोकरवर्गासाठी ३ हजार बिऱ्हाडांच्या जागा बांधण्यांत आल्या आहेत व आणखी १,२०० जागा बांधल्या जात आहेत. त्याशिवाय प्रमुख अधिकाऱ्यांसाठी १२० बंगले बांधण्यांत आले आहेत. ह्या सर्व इमारती भारत सरकारकडून कर्जाऊ रकमा घेऊन बांधावयाच्या म्हटलें तर मध्यप्रदेश सरकारला तें जमण्यासारखें नाहीं, असें सांगण्यांत येत आहे. कारण, कर्जाऊ रकमेवर व्याज द्यावें लागेल आणि मुद्दलाचे हप्तेहि चुकवावे लागतील. राज्य सरकारांना कांहीं विलक्षण परिस्थितीला तोंड द्यावें लागत असल्यास त्यांना खास मदत देण्यांत यावी, अशी सूचना पहिल्या फायनॅन्स कमिशननें केली आहे. तिचा आधार मध्यप्रदेश सरकार घेत आहे.

---

**पोरबंदर बंदराची सुधारणा**—पोरबंदर बंदराची सुधारणा करून तें बारमाही बंदर म्हणून उपयोगांत आणण्यासाठी गुजरात सरकारनें एक योजना आखली आहे. ह्या कामाची प्राथमिक तयारी ह्याच वर्षी करण्यांत येईल व पुढील वर्षी मुख्य कामाला प्रारंभ होईल. संपूर्ण योजनेसाठी १ कोट रुपये खर्च येईल.

## सरकारचीं कर्जें कोणीं घेतलीं आहेत ?

### व्यक्तींच्या नांवावर फक्त ४·७%

मार्च, १९६० असेरच्या आकड्यांवरून मध्यवर्ती व राज्य सरकारांच्या कर्जरोख्यांची मालकी कोणाकडे आहे, हें दिसून येतें :—

| | कोटी रु. | एकूणशीं प्रमाण % |
|---|---|---|
| १ मध्यवर्ती व राज्यसरकारें | २६२·९ | १०.२ |
| २ रिझर्व्ह बँक | ४६६·९ | १८·१ |
| ३ व्यापारी व सहकारी बँका | ७३२·५ | २८·४ |
| ४ ला. इं. कॉर्पोरेशन | ३०५·७ | ११·८ |
| ५ इतर विमा–संस्था | २८·७ | १·४ |
| ६ प्राव्हिडंट फंड्स | १७३·२ | ६·७ |
| ७ इं. फि. कॉर्पोरेशन व स्टे. फि. कॉर्पोरेशन्स | ३·२ | ०·१ |
| ८ रिझर्व्ह बँक ( इतरांचीं खातीं ) | ४१·२ | १·६ |
| ९ भारताबाहेरील | ३४·५ | १·३ |
| १० इतर | ५३१·७ | २०·६ |

सरकारी मालकीपैकी मध्यवर्ती सरकारकडे फक्त ५ कोटी रु. चीं कर्जें असून बाकीच्या २५८ कोटी रु. चे कर्जरोखे राज्यसरकारें धारण करीत आहेत. रोख शिलकांची गुंतवणूक, सिंकिंग फंड, जमीनदारी अबॉलिशन फंड, फॅमीन रिलीफ फंड, घसारा फंड, वीज रिझर्व्ह फंड, इत्यादींच्या रकमांची ती गुंतवणूक आहे. कोष्टकांतील तिसऱ्या बाबीमध्यें ६८८ कोटी रु. शेड्यूल्ड बँकांचे, १० कोटी रु. बिगर शेड्यूल्ड बँकांचे आणि ३४ कोटी रु. सहकारी बँकांचे आहेत. दहाव्या बाबींची छाननी केली, तर त्यांतील बहुतेक रकम ट्रस्ट्स, स्थानिक स्वराज्य संस्था, जॉइंट स्टॉक कंपन्या, इत्यादींच्या वतीनें गुंतविलेली होती. व्यक्तींनीं घेतलेल्या सरकारी रोख्यांची किंमत फक्त १२२ कोटी रु. म्हणजे एकूण रोख्यांच्या ४·७% भरेल.

### दि म्हैसूर किर्लोस्कर लि.,

दि म्हैसूर किर्लोस्कर लिमिटेडनें प्रत्येकी रुपये १०० ( शंभर ) चे १५,००० इक्विटी शेअर्स व प्रत्येकी रुपये १०० ( शंभर ) चे २५,००० रिडीमेबल क्युमिलेटिव्ह पार्टिसिपेटिंग प्रेफरन्स शेअर्स काढण्याचें ठरविलें आहे. प्रेफरन्स शेअर्सची परत खरेदी दि. ३० जून, १९७५ पूर्वी व दि. ३० जून, १९८० नंतर होणार नाहीं. ज्या वेळीं कंपनी इक्विटी शेअर्सवर १२½ टक्क्यांपेक्षा कमी नफ्याची वांटणी जाहीर करील त्या वेळीं प्रेफरन्स शेअर्सवर ठराविक ८ टक्के मिळतील. जर कंपनीनें १२½ टक्क्यांपेक्षा जास्त पण १५ टक्क्यांपेक्षा कमी नफा इक्विटी शेअर्सवर जाहीर केला तर प्रेफरन्स शेअर्सवर ९ टक्के; व इक्विटी शेअर्सवर १५ टक्क्यांपेक्षा जास्त नफा जाहीर केला तर प्रेफरन्स शेअर्सवर १० टक्के मिळतील. प्रेफरन्स शेअर्सवरील ही जास्तींत जास्त नफ्याची वांटणी असेल. कंपनीच्या वाढीच्या योजना व कार्यक्रमास पैसा पुरविणें हा या योजनेचा हेतु आहे.

दि. १५ मे, १९६१ रोजीं सकाळीं १०–३० वा. वर्गणीदारांची यादी उघडून दि. १७ मे, १९६१ रोजीं किंवा डायरेक्टरांच्या मर्जीनुरूप त्यानंतरहि दुपारीं ३ वाजतां बंद करण्यांत येईल. किमान ८ ( आठ ) विभाग ( शेअर्स ) किंवा त्याच्या पटीच्या प्रमाणांत मागणींचे अर्ज केले पाहिजेत. या ८ ( आठ ) विभागाच्या प्रत्येक गटांत ३ ( तीन ) इक्विटी शेअर्स व ५ (पांच) प्रेफरन्स शेअर्स असतील.

### शिक्षा झालेल्या गुन्हेगारांसाठी शाळेचा प्रयोग

बिहार सरकारनें ४ वर्षांपूर्वी एका धाडसी प्रयोगाची सुरुवात केली होती. कोर्टांत शिक्षा झालेल्या गुन्हेगारांसाठी हजारीबाग येथें सरकारनें एक हायस्कूल स्थापन केलें. हा प्रयोग यशस्वी झाल्याचें आढळून आलें आहे. गुन्हेगारांची सुधारणा करण्यासाठी अलीकडे तुरुंगांत व बाहेर अनेक प्रकारचे प्रयत्न करण्यांत येत असतात. पण गुन्हेगारांना शिक्षण देण्यासाठी हायस्कूल स्थापन केल्याचें आशिआ खंडांतील हें पहिलेंच उदाहरण आहे. बिहारमधील तुरुंगांत शिक्षा भोगीत असलेल्या कोणत्याहि गुन्हेगाराला हजारीबाग येथील शाळेंत प्रवेश दिला जातो. मात्र त्याची वागणूक चांगली असली पाहिजे आणि कांहींतरी शिकण्याकडे त्याचा कल असला पाहिजे. शाळेंत प्रवेश करण्यासाठी गुन्हेगारानें कोठला गुन्हा केला आहे त्याचा विचार करण्यांत येत नाहीं. गुन्हेगार विद्यार्थ्यांना सरकारच्या सेकंडरी बोर्ड सर्टिफिकेटच्या परीक्षेला बसून दाखलाहि घेतां येतो. पुष्कळसे विद्यार्थी अशा तऱ्हेनें बोर्डाची परीक्षा पास झालेले आहेत. गुन्हेगारांसाठी चालविलेल्या ह्या शाळेंत वाचनालय, वादविवाद मंडळ, नाट्य मंडळ, इत्यादी संघटना आहेत. त्याशिवाय सामाजिक सेवेवर अधिक भर देण्यांत येत असतो. हजारीबाग येथील प्रशाळेंत सध्यां १०० विद्यार्थी आहेत. त्यांना शिकविणारे शिक्षक मूळचे गुन्हेगार पण पदवी संपादन केलेले असे आहेत. पण शाळेंतील कांहीं अभ्यासक्रम शिकविण्यासाठी तज्ज्ञ व लायक शिक्षकांची गरज आहे. तसें शिक्षक मात्र शाळेला मिळूं शकत नाहींत. बोलून चालून गुन्हेगारांसाठी चालविलेल्या शाळेंत बाहेरच्या जगांतील शिक्षक येण्यास नाखूष असतात हें साहजिक आहे. अशा शिक्षकांना चांगला पगार देण्यांत यावा अशी सूचना करण्यांत आली आहे.

### श्री. भाभा ह्यांच्या विवेचनाची प्रतिक्रिया

इंडियन बँक्स असोसिएशनच्या गेल्या वार्षिक सभेंत श्री. सी. एच. भाभा ह्यांनीं हिंदी बँकांतील कर्मचारी इतर देशांतील कर्मचाऱ्यांपेक्षा कितीतरी कमी दिवस व कमी तास काम करतात, हें दाखविण्यासाठी तुलनात्मक आंकडे दिले. कमी काम म्हणजे सुबत्ता आणि समाधान, असें समीकरण मांडलें, तर हिंदी कर्मचाऱ्यांइतके सुखी इतरत्र आढळणार नाहींत; वर्षांतून अनेक महिने किंवा महिन्यांतून अनेक आठवडे व दिवस काम करावें न लागणारे लोक आदर्श ठरतील. वास्तविक ते दरिद्री, बेकार कां असेनात ! कार्यक्षमतेला आवश्यक तेवढें आर्थिक स्वास्थ्य मिळवून देणारें वेतन आणि विश्रांतीचा वेळ घालविण्यासाठी खर्च करायला उपलब्ध पैसा आहे किंवा नाहीं, हा महत्त्वाचा प्रश्न श्री. भाभा यांनीं उपेक्षिला असल्यानें त्यांच्या विवेचनांत एकतर्फीपणा आला आहे अशी त्याची प्रतिक्रिया व्यक्त करणारा एक लेख आम्हीं आजच्या अंकांत प्रसिद्ध केला आहे.

### भारतांत संपूर्ण स्वदेशी मोटार

आगाऊ ठरल्याप्रमाणें सरकारी कारखान्यांतून १९६३ सालीं ' संपूर्ण स्वदेशी ' मोटारी तयार होऊं लागतील. सरकारचा अंतिम निर्णय निश्चित झाल्यावर प्रत्यक्ष कारखाना उभारून मोटारी तयार होण्यास निदान अठरा महिने जावे लागतील. त्यासाठी भारत सरकारनें एक कमिटी नेमली आहे. तिच्या अहवालावर विचार होऊन मग सरकार याबाबत असेरचा आपला निर्णय घेईल, असें उद्योगमंत्र्यांनीं स्पष्ट केलें आहे.

## बँक कर्मचाऱ्यांचे कामाचे तास

### श्री. भाभा ह्यांच्या आंकडेवारीची दुसरी बाजू

'अर्था'च्या दि. १९–४–१९६१ च्या अंकांत आलेली पृष्ठ ८१ वरील माहिती वाचली.

श्री. सी. एच. भाभा यांनीं दिलेली आंकडेवारी फसवी वाटते. निरनिराळ्या देशांतील बँक-सुट्टयांचा तपशील देतांना भारतांत एका वर्षांत २५ सुट्ट्या दाखविल्या आहेत. परंतु १९६१ सालीं यांपैकी दोन सुट्ट्या रविवारीं पडत असल्यामुळें (१–१–६१ आणि १९–३–६१) प्रत्यक्षांत २३ च सुट्ट्या पडतात. अशा एकदोन सुट्ट्यांचे दिवस दरवर्षी बहुधा रविवारीं पडणारच. शिवाय १९६१ सालीं तीन सुट्ट्या शनिवारीं पडतात. (२५–३–६१, २४–६–६१ व ३–९–६१) म्हणजे अर्ध्या दिवसाच्या हिशेबानें तीन सुट्ट्यांची दीडच सुट्टी झाली. ही बुडालेली दीड दिवसांची सुट्टी वरील उरलेल्या २३ सुट्ट्यांतून वजा केली तर प्रत्यक्षांत वार्षिक सुट्ट्या २१॥ च झाल्या.

यानंतर कामाच्या साप्ताहिक तासांसंबंधीं विचार करूं. (आपल्या पत्रांत साप्ताहिक तासांऐवजीं साप्ताहिक दिवस अशी मुद्रण–चूक झाली आहे.) माझ्या माहितीप्रमाणें भारतीय बँकांतील कर्मचारी रोज किमान साडेसात तास काम करतो. म्हणजे सोमवार ते शुक्रवार या पांच दिवसांत साडेसदतीस तास होतात, आणि शनिवारचे चार तास मिळविले कीं साप्ताहिक तास साडेएक्केचाळीस होतात. एखादे वेळीं कामांत चूक झाली, रोकड शिल्लक जमली नाहीं कीं चार चार तास जादा बसावें लागतें. शिवाय सहामाही व वार्षिक हिशेबाचे वेळीं प्रत्येकी सुमारें चोवीस तास जादा काम करावें लागतें. या हिशेबानें साप्ताहिक सरासरी तास सुमारें त्रेचाळीस होतील; श्री. भाभा म्हणतात त्याप्रमाणें साडेछत्तीस नव्हे.

या हिशेबानें कामाचे वार्षिक तास ता. ४३ तास × ५२ आठवडे = २,२३६ वजा (२१॥ सुट्यांचे साडेसात तासांच्या हिशेबानें) १५८ तास = २,०७८ म्हणजे श्री. भाभांच्या कोष्टकांत दाखविलेल्या कोठल्याहि देशापेक्षा किमान शंभरांनीं जास्ती होतात. श्री. भाभांच्या म्हणण्याप्रमाणें १,६१० नव्हे.

या दृष्टीनें विचार केला तर श्री. भाभांची सर्व आंकडेवारी फसवी व खोटी वाटते. अशा फसव्या लिखाणाला आपल्यासारख्या समतोल बुद्धीच्या जबाबदार पत्रानें झपाट्यानें प्रसिद्धि द्यावी याचें वाईट वाटलें. महत्त्वाची गोष्ट म्हणजे वेतनाची. श्री. भाभा यांनीं वेतनाचे तुलनात्मक आंकडे कां दिले नाहींत? कारण मतलबीपणा हें उघड आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वी महाराष्ट्रांतील एका जिल्ह्याच्या गांवीं मासिक पांच रुपयांवर बँकांत उमेदवारी केलेले लोक आहेत. इतका कमी पगार देणाऱ्या बोथट मालकांना मितव्ययी, व्यवस्थाचतुर, इत्यादि विशेषणें देण्यांत येतात. परदेशांत बँक मॅनेजर, अकौंटंट, कॅशिअर, कारकून, शिपाई, इत्यादि कर्मचाऱ्यांना काय वेतन मिळतें व तुलनात्मक त्या जागांना भारतांत काय वेतन मिळतें यांचे आंकडे समोरासमोर मांडले तर त्रयस्थालासुद्धां त्याची लाज वाटेल.

या संबंधांत एक विनोद प्रसिद्ध आहे. एका गांवांत एकाच वस्तूच्या उत्पादनाचीं तीन उत्पादनगृहें होतीं. उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ. मध्यमगृहांतील कामगारानें मालकाकडे कधीं पगारवाढ मागितली कीं मालक म्हणत, "अरे, कनिष्ठगृहांत दोनच रुपये रोज आहे. आम्ही तुला सव्वादोन रुपये रोज देतों." आणि उत्पादन कमी झालें कीं कामगाराला मालक म्हणे, "अरे, उत्तमगृहांत प्रत्येक कामगार रोज २० रत्तल उत्पादन करतो. तूं १६ रत्तल इतकें कमी काम कां करतोस?" म्हणजे उत्पादन-तुलनेला उत्तमगृह व रोजगार तुलनेला कनिष्ठगृह घ्यावयाचें! तद्वत् श्री. भाभा सुट्या आणि कामाचे तास यांचें कोष्टक मांडतात; पण वेतनाचें मांडत नाहींत. कारण तें त्यांच्या अंगाशीं येईल. फोर्ड मोटार कारखान्यांत प्रत्येक कामगाराला मोटार असते आणि सप्ताहाशेवटीं तो उपनगरांत बायकांमुलांसह पिकनिकला जाऊं शकतो, तर पुण्यांतील बँक कर्मचारी मधल्या सुट्टींत चहापानाकरितां दोन आणे खर्च करतांना तीनदां विचार करतो आणि रविवारीं बायकामुलांना घेऊन संभाजी पार्कमध्यें एक आण्याची भेळ खातो!

मुंबई, २८–४–१९६१ — आपला, ना. शं. कानिटकर

## साखरेच्या तारणावर अधिक कर्ज

साखर कारखान्यांना साखरेच्या तारणावर कर्ज देणाऱ्या शेड्यूल्ड बँकांनीं त्यांच्याकडे असलेल्या साखरेवर १०० टक्के कर्ज द्यावें अशी सूचना रिझर्व्ह बँकेनें त्यांना द्यावी असा सल्ला भारत सरकारनें रिझर्व्ह बँकेला दिला आहे. गेल्या व चालू हंगामांत साखरेचें उत्पादन दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील उद्दिष्टांपेक्षा ३० टक्क्यांनीं अधिक वाढलें. त्यामुळें साखरेचे साठे कारखान्यांच्या गुदामांतून पडून राहू लागले. साखर कारखान्यांना ऊंस घालणाऱ्या शेतकऱ्यांचे पैसे चुकवितां येईनात. साखर–कारखान्यांवर आलेल्या संकटांतून मार्ग काढण्यासाठी साखरेवरील कर्जाची मर्यादा वाढविण्यांत आलेली आहे.

टेलिफोन नं. २४८३. तार :

# पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड,

लक्ष्मी पथ, पुणें शहर.

इकडे वेळींच लक्ष द्या.........

आकर्षक व्याजाच्या दरानें आपला पैसा सहकारी बँकेंत गुंतवून निश्चिंत रहा.

दिनांक १ एप्रिल, १९६१ पासून आमचे बँकेनें कायम व सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचे दरांत वाढ केली आहे.

| कायम ठेव | व्याजाचे नवीन दर |
|---|---|
| १ वर्ष ... ... | ४ टक्के |
| २ वर्षें ... ... | ४। टक्के |
| ३ वर्षें ... ... | ४॥ टक्के |
| सेव्हिंग्ज ठेव ... ... | २॥ टक्के |

या खेरीज शॉर्ट टर्म व कॉल डिपॉझिट्सवरील व्याजाचे दराबाबत चौकशी करणेसाठी कार्यकारी संचालक यांना बँकेचे वेळेंत समक्ष भेटा. संबंधी सर्व माहिती ते आनंदानें पुरवतील.

बा. म. अळतेकर, बी. कॉम., कार्यकारी संचालक.

शि. म. काळे, एम्. एल्. ए. अध्यक्ष.

# THE BANK OF

## BALANCE SHEET AS

| 31-12-1959 | CAPITAL & LIABILITIES | | |
|---|---|---|---|
| Rs. | | Rs. nP. | Rs. nP. |
| | **1. Capital** | | |
| | Authorised Capital: | | |
| 50,00,000 | 1,00,000 Shares of Rs. 50/- each ... | | 50,00,000—00 |
| | ISSUED AND SUBSCRIBED CAPITAL: | | |
| 32,00,000 | 80,000 Shares of Rs. 50/- each ... | | 40,00,000—00 |
| | CALLED AND PAID-UP CAPITAL: | | |
| 32,00,000 | 64,000 shares of Rs. 50/- each fully paid up ... | 32,00,000—00 | |
| | *Less*: Calls in Arrears: | | |
| Nil | From Directors Nil | | |
| 31,850 | From others ... Rs. 14,215-00 | 14,215—00 | 31,85,785—00 |
| 31,68,150 | | | |
| Nil | Share Application Deposit ... | | 4,32,380—00 |
| 13,00,000 | **2. Reserve Fund and Other Reserves:** | | |
| | * As per last Balance Sheet ... | 14,60,000—00 | |
| | Additions during the year: ... | | |
| 1,60,000 | Reserve Fund ... | 2,00,000—00 | |
| Nil | Industrial Development Fund ... | 40,000—00 | |
| Nil | Staff Benefit Fund ... | 10,000—00 | 17,10,000—00 |
| 14,60,000 | | | |
| | * (Includes Rs. 2,52,995/- received as premiums on issue of shares in past years) | | |
| | **3. Deposits and Other Accounts:** | | |
| 5,31,48,081 | Fixed Deposits and Cash Certificates ... | 6,16,36,899—12 | |
| 4,18,03,161 | Savings Bank Deposits ... | 5,09,49,157—01 | |
| 3,76,04,897 | Current accounts, Contingency accounts etc. ... | 3,87,69,914—59 | 15,13,55,970—72 |
| 13,25,56,139 | | | |
| | **4. Borrowing from other Banking Companies Agents etc.:** | | |
| Nil | (i) In India ... | Nil | |
| Nil | (ii) Outside India ... | Nil | Nil |
| | Particulars | | |
| Nil | (i) Secured ... | Nil | |
| Nil | (ii) Un-Secured ... | Nil | |
| 17,52,310 | **5. Bills Payable** | | 16,50,549—68 |
| | **6. Bills for Collection, being Bills Receivable as per Contra:** | | |
| 1,07,61,112 | (i) Payable in India ... | 1,25,72,731—21 | |
| Nil | (ii) Payable outside India ... | 54,913—56 | 1,26,27,644 77 |
| | **7. Other Liabilities** | | |
| 16,073 | (i) Unpaid Dividend ... | 19,498—60 | |
| 112 | (ii) Rebate on Bills Discounted ... | 336—20 | |
| 25,66,041 | (iii) Branch Adjustments ... | 34,10,737—50 | 34,30,572—30 |
| 25,82,226 | | | |
| 41,41,479 | **8. Acceptances, Endorsements and other obligations as per Contra:** ... | | 58,74,555—96 |
| | **9. Profit and Loss:** | | |
| 1,92,534 | Profit as per last Balance Sheet ... | 3,11,367—19 | |
| 1,53,195 | *Less*: Appropriations: Dividend ... | 2,68,792—08 | |
| 39,339 | | 42,575—11 | |
| 7,72,028 | *Add*: profit for the year (subject to taxation) brought from the Profit and Loss Account ... | 9,50,033—69 | |
| 8,11,367 | | 9,92,608—80 | |
| 1,60,000 | *Less*: Transferred to Reserve Fund Rs. 2,00,000-00 | | |
| Nil | Industrial Development Fund Rs. 40,000-00 | | |
| Nil | Staff Benefit Fund Rs. 10,000-00 | | |
| 3,40,000 | Provision for Income-tax and Super-tax Rs. 3,50,000-00 | 6,00,000—00 | 3,92,608—80 |
| 3,11,367 | | | |
| | Carried Over Rs. ... | | 18,06,60,067—23 |

# MAHARASHTRA, LIMITED, POONA.

## AT 31st DECEMBER, 1960

| 31-12-1959 | PROPERTY & ASSETS | | |
|---|---|---|---|
| Rs. | | Rs. nP. | Rs. nP. |
| | 1. **Cash** | | |
| 1,61,04,026 | In hand and with Reserve Bank and State Bank of India ( Including foreign currency notes ) ... | | 1,69,75,743—65 |
| | 2. **Balances with other Banks** ( in Current Account ) | | |
| 10,45,199 | ( i ) In India ... | 12,61,936—26 | |
| Nil | ( ii ) Outside India ... | 1,77,791—55 | 14,39,727—81 |
| 53,00,000 | 3. **Money at Call and Short Notice** | | 51,00,000—00 |
| | 4. **Investments:** ... | | |
| | Securities—At or below redemption value : | | |
| | ( i ) Securities of the Central and State Government and other trustee securities, including Treasury Bills of the Central and State Governments. (Out of these, securities of the face value of Rs. 3,10,26,800/- are with Banks for overdraft and other arrangements ). ... | | |
| | (Market value Rs. 6,11,72,378-20) | | |
| 6,22,25,029 | (Face value Rs. 6,30,67,900-00) ... | 6,07,81,240—98 | |
| | ( ii ) Shares : At or below cost : | | |
| | Ordinary Shares (fully paid-up) (Market value Rs. 13,12,094-70) Rs. 9,01,015-17 | | |
| | Preference shares (fully paid-up) (Market value Rs. 13,58,173-45) Rs. 12,98,564-15 | | |
| Nil | Ordinary shares (partly paid-up) | | |
| 17,92,483 | ( Market Value Rs. 60,650-00) Rs. 48,967-75 | | |
| | Preference shares (partly paid-up) (Market value Rs. 98,000-00) Rs. 88,000-00 | 23,36,547—07 | |
| | (iii) Debentures or Bonds : At cost ... | | |
| 12,46,635 | (Market value Rs. 31,37,141-90) ... | 31,31,945—50 | |
| Nil | (iv) Gold ... | Nil | 6,62,49,733—55 |
| 6,52,64,147 | | | |
| | 5. **Advances** ( Other than bad and doubtful debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors ). | | |
| | (1) Loans, Cash Credits, Overdrafts etc. | | |
| 4,86,40,880 | ( i ) In India 6,65,23,122—48 | | |
| Nil | ( ii ) Outside India Nil | 6,65,23,122—48 | |
